**प्रेस नोट दिनांक २१/०५/२०१९**

**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**बेकायदेशीर शस्त्र (सुरा)जवळ बाळगलेवरुन गुन्हा दाखल बाबत.**

दिनांक २०/०५/२०१९ रोजी हजेरीवर लोकसभा निवडणुक मतमोजणीच्या अनुषंगाने पोलीस ठाणे हद्दीमध्ये संशयीत लोकांची तपासणी करणेबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक,कृष्णा इंदलकर यांनी मार्शल डयुटीवर असलेले कर्मचारी यांना सुचना दिलेल्या होत्या. त्याप्रमाणे शिवराणा मार्शलचे कर्मचारी पोशि. ७८५६, मच्छींद्र शिरसाठ व पोशि. ८७५०, अविनाश गोरे असे चौकीच्या हद्यीत पेट्रोलींग करीत होते. त्यांना १९.०० वा. चे सुमारास जुना मुंढवा रोड, बॉलीवुड थिएटरजवळ एक इसम साईनाथनगरच्या दिशेने लपत, छपत जात असतांना दिसुन आला. त्याचेबाबत सदर कर्मचारी यांना संशय वाटु लागल्याने सदर इसमास त्यांनी १९.१५ वा. जागीच पकडुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचेकडे एक लोखंडी सुरा शर्टच्या आत उजव्या बाजुस ठेवला असल्याचे दिसुन आल्याने तो काढुन घेवुन, त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने त्याचे नाव अनिकेत हरिशंकर मिश्रा,वय १९, रा. फलॅ.नं. के-३०२, महागणेश नगरी, केशवनगर, मुंढवा, पुणे असे असल्याने सांगितले. सदर इसमास कर्मचायांनी पोलीस ठाणेस आणुन सपोनि. मोरे यांचेसमोर हजर केले असता सपोनि. मोरे यांनी दोन पंचासमक्ष सदरचा सुरा पंचनाम्याने जप्त करुन घेवुन, त्याचेविरुध्द पोशि. मच्छींद्र शिरसाठ यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा र.नं. २१७/१९, म. पो. अधि. कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोना. ५८३१, प्रदिप सोनवणे करीत आहेत.

वरीलप्रमाणे शिवराणा मार्शलचे कर्मचारी पोशि. मच्छींद्र शिरसाठ व पोशि. अविनाश गोरे यांनी, आरोपीचे ताब्यातुन बेकायदेशीरपणे सुयासारखे हत्यार जवळ बाळगले असताना ते त्याचे ताब्यातुन काढुन घेवुन, त्याचे हातुन होणाया शरीराविरुध्दच्या गुन्हयास प्रतिबंध करुन सदरची चांगली कामगिरी केली आहे.